PNA/HSG/467/68

# श्रीराम ज्योती सहकारी गृहरचना संस्था. मर्यादित.

२०/४८, गुळवणी महाराज रस्ता, एरंडवणे, पुणे - ४११००४

दि. ०६/०७/२०२४

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस.**

प्रति,

सन्माननीय सभासद,

सस्नेह नमस्कार,

संस्थेच्या काही सभासदांनी मागणी केल्यानुसार संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २० जुलै २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता सेवा भवन सभागृह, (basement), हॉटेल भालेकरच्या मागे, (CDSS कंपनीच्या गल्लीमध्ये) पटवर्धन बाग, पुणे ४११००४ येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय

विषय क्र. १ : मा. अध्यक्षांना सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याबाबत विनंती करणे.

विषय क्र.२ : सोसायटीचे वकील ॲड. उन्मेष देशपांडे हे दोन सभासदांनी केलेल्या कोर्टातील दाव्यासंदर्भात सर्व सभासदांना सदर दाव्याच्या सद्यस्थितीची माहिती देतील.

विषय क्र. ३ : संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात सविस्तर चर्चा करणे व मा. सहकार न्यायालय क्र. २ यांच्या आदेशानुसार पुनर्विकसनासंदर्भातील आधीचे ठराव रद्द करणे व नव्याने ठराव मंजूर करणे.

विषय क्र. ४ : मा. सहकार न्यायालय क्र. २ यांच्या आदेशानुसार पुनर्विकसनाच्या कामासाठी Project Management Consultant (PMC) / वास्तूविशारदाची निवड करणे.

विषय क्र. ५ : संस्थेचे सहसभासद श्री. सुरेश लिमये व श्री. राहुल गनबोटे यांनी वेळोवेळी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर / समस्यांवर / तक्रारींवर सविस्तर चर्चा करणे.

AnyScanner

सदर सभा सभासदांच्या मागणीनुसार होत असल्यामुळे सभेच्या दिवशी नमूद केलेल्या ठिकाणी व वेळी गणपूर्ती आवश्यक आहे. गणपूर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर सभेचे कामकाज ७ दिवसांनी त्याच ठिकाणी करण्यात येईल. तहकुबीनंतर झालेल्या सभेत गणपूर्ती झाली नसल्यास मूळ सभेच्या कार्यक्रम पत्रिकेवर असलेले कामकाज पार पाडले जाईल. सदर सभेत होणारे कामकाज कायदेशीर असेल व घेतले जाणारे निर्णय सर्व सभासदांवर बंधनकारक राहतील याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

सदर सभेमध्ये अत्यंत महत्वाच्या विषयांवर चर्चा करून ठराव पारित करण्यात येणार असल्यामुळे सर्व सभासदांनी वेळेवर सभेला उपस्थित रहावे ही नम्र विनंती तसेच ही विशेष सर्वसाधारण सभा असल्यामुळे सदर सभेत होणाऱ्या चर्चेत व मतदान प्रक्रियेत फक्त सभासद अथवा सहसभासद (सभासद गैरहजर असतील तर) यांनाच भाग घेता येईल याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

सचिव

गोपाळ कुलकर्णी

श्रीराम ज्योती सहकारी गृहरचना संस्था मर्या.
एरंडवणे, पुणे-४